# १०. ग्राहक सहकारी संस्था

## Consumers Co-operative Society


| | | | |
|---|---|---|---|
| १०.१ | प्रस्तावना | १०.५ | प्रकार |
| १०.२ | अर्थ आणि व्याख्या | १०.६ | सारांश |
| १०.३ | वैशिष्ट्ये | १०.७ | महत्वाच्या संज्ञा |
| १०.४ | कार्ये | १०.८ | स्वाध्याय |




ग्राहक सहकारी संस्था

### १०.१ प्रस्तावना (Introduction)

जागतिक सहकारी चळवळीचा उगम मुळातच सहकारी ग्राहक संस्थांच्या स्थापनेतून झालेला दिसून येतो. इ.स. १८४४ मध्ये इंग्लंडमधील रॉश्डेल येथे २८ विणकरांनी एकत्र येऊन 'रॉश्डेल इक्विटेबल पायोनिअर्स सोसायटी लिमिटेड' ची स्थापना केली. भारतामध्ये पहिले सहकारी ग्राहक भांडार २०सप्टेंबर, १९०५ रोजी चेन्नई (मद्रास) येथे स्थापन झाले. 'ट्रिप्लिकेन अर्बन को. ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड' या नावाच्या संस्थेने भारतातील पहिल्या ग्राहक सहकारी संस्थेची मुहूर्तमेढ रोवली.

दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या काळात अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीमध्ये मोठया प्रमाणावर वाढ झाली. त्या वेळी शासनाने नियंत्रित दरात अन्नधान्य व इतर वस्तूंच्या वितरणाची जबाबदारी सहकारी ग्राहक संस्थांवर सोपविली.

ग्राहकांना चांगल्या प्रतीचा माल योग्य किंमतीत मिळावा म्हणून ग्राहक भांडाराची स्थापना केली जाते. ग्राहक सहकारी संस्था आपल्या सभासदांना लागणारा माल थेट उत्पादकांकडून खरेदी करते. त्यामुळे मालाच्या वितरणात असणारे मध्यस्थ, व व्यापाऱ्यांचे उच्चाटन होते. थेट उत्पादकांकडून माल खरेदी केल्याने ग्राहक भांडाराला माल कमी किंमतीत मिळतो. त्यामुळे

या संस्था आपल्या सभासदांना वाजवी किंमतीत माल पुरवितात. ग्राहक सहकारी संस्था नफा मिळविण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या नसतात, म्हणून ते भेसळ करीत नाहीत. ग्राहकांना चांगल्या प्रतीचा माल वाजवी किंमतीत व आवश्यक त्यावेळी मिळू शकतो. ग्राहक सहकारी भांडारातून मिळणाऱ्या फायद्यामधून ग्राहक सहकारी संस्थेचा विकास झाला.

सर्वसामान्य ग्राहकांना त्यांच्या दैनंदिन गरजेच्या वस्तू व सेवा रास्तदराने उपलब्ध करून देण्यासाठी सहकारी ग्राहक संस्थांची भूमिका खूप महत्त्वाची आहे. त्यादृष्टीने ग्राहकांच्या संरक्षणासाठी व हितासाठी भारत सरकारने इ.स.१९८६ मध्ये ग्राहक संरक्षण कायदा लागू केला आहे. २४ डिसेंबर हा दिवस "राष्ट्रीय ग्राहक दिन" म्हणून साजरा करण्यात येतो. तसेच १५ मार्च हा 'जागतिक ग्राहक दिन' म्हणून पाळला जातो. महाराष्ट्रात मार्च २०१८ अखेर ग्राहक सहकारी संस्थांची संख्या २,१२५ इतकी होती.

ग्राहक हा अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू असतो. ग्राहक बाजारपेठेचा राजा असला तरी त्याचे होणारे शोषण ही नित्याची बाब झाली आहे. या प्रकरणात आपण ग्राहक सहकारी संस्थेचा सविस्तर अभ्यास करणार आहोत.

## १०.२ अर्थ व व्याख्या : Meaning and Definition

### अर्थ :

ग्राहकांनी स्वेच्छेने एकत्र येऊन लोकशाही पद्धतीने सहकारी तत्त्वावर आपल्या आर्थिक हितसंबंधाचे संरक्षण करण्यासाठी एकत्र येऊन स्थापन केलेली संस्था म्हणजे ग्राहक सहकारी संस्था होय.

ग्राहक सहकारी संस्थेचा मुख्य हेतू उत्पादकापासून अंतिम उपभोक्त्यांपर्यत असलेल्या वितरण साखळीतील घाऊक व्यापारी, किरकोळ व्यापारी, मध्यस्थ, दलाल, यांचे उच्चाटन करणे. आणि ग्राहकांच्या हिताचे रक्षण करणे हा असतो. ग्राहकांना त्यांच्या गरजेनुसार निर्भेळ व दर्जेदार वस्तू रास्त किमतींला उपलब्ध करून दिल्या जातात.

बहुतेक ग्राहक सहकारी संस्था या रॉश्डेल प्रणित सहकारी तत्त्वानुसार कार्य करतात. खाजगी व्यापाऱ्यांच्या मक्तेदारी, साठेबाजी, भेसळ इ. सारख्या वाईट प्रवृत्तींना आळा घालून ग्राहकांची होणारी पिळवणूक थांबवून ग्राहकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्यासाठी या संस्था सतत प्रयत्नशील असतात.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील मालाच्या वितरणात असणारे दोष दूर करण्याकरिता ग्राहकांना संघटितपणे प्रयत्न करावे लागतात. ग्राहकांना चांगल्या मालाचा योग्य किंमतीत पुरवठा व्हावा म्हणून ग्राहक सहकारी संस्थांची स्थापना केली जाते.

### व्याख्या :

ग्राहक सहकारी संस्थेच्या व्याख्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) ''ग्राहकांना निर्भेळ व दर्जेदार जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा व्हावा या उद्देशाने स्वेच्छेने व परस्पर सहकार्याने सहकारी तत्त्वावर स्थापन केलेली संस्था म्हणजे ग्राहक सहकारी संस्था होय.''

२) ''ग्राहकांनी स्वेच्छेने एकत्र येऊन परस्परांच्या हितांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी लोकशाही आणि सहकारी तत्त्वावर स्थापन केलेली ग्राहकांची आर्थिक संघटना म्हणजे ग्राहक सहकारी संस्था होय.''

३) ''ग्राहकांनी आपल्या गरजा भागविण्यासाठी उपभोग्य वस्तू व सेवा मिळविण्यासाठी स्वेच्छेने स्थापन केलेले संघटन म्हणजे सहकारी ग्राहक संस्था होय.''

## १०.३ ग्राहक सहकारी संस्थेची वैशिष्ट्ये. (Features of Consumer Co-operative Society)

❑ **ग्राहक सहकारी संस्थेची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.**

१) **स्थापना :** ग्राहक सहकारी संस्था आपल्या ग्राहकांना जीवनावश्यक व उपभोग्य वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी स्थापन केलेल्या असतात. ग्राहक हे विविध भागात विखुरलेले असल्याने ग्राहक सहकारी संस्था ह्या ग्रामीण व शहरी भागात स्थापन झालेल्या आढळून येतात.

**• ग्राहक सहकारी संस्थेची वैशिष्ट्ये**

१) स्थापना
२) ग्राहकांचे स्वेच्छा संघटन
३) रोखीने व्यवहार
४) ग्राहकांना दर्जेदार व निर्भेळ वस्तूंचा पुरवठा
५) लोकशाही पद्धतीने कारभार
६) नफेखोरीला आळा
७) राहणीमानात सुधारणा
८) रास्त किंमत
९) संघटनात्मक संरचना
१०) उत्पादकाकडून मालाची खरेदी

२) **ग्राहकांचे स्वेच्छा संघटन :** ग्राहक सहकारी संस्था ग्राहकांनी त्यांच्या हिताचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी स्वेच्छेने एकत्र येऊन स्थापन केलेली असते. भांडवलदाराकडून ग्राहकांचे होणारे शोषण व खाजगी व्यापाऱ्यांच्या पिळवणूकीपासून ग्राहकांना मुक्त करण्यासाठी या संस्था स्थापन केल्या जातात.

३) **रोखीने व्यवहार :** ग्राहक सहकारी भांडारामध्ये मालाची विक्री केवळ रोखीनेच केली जाते. ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी उधारीवर माल विकण्याची किंवा अधिक नफा मिळविण्याची कार्यपद्धती या संस्थांमार्फत स्वीकारली जात नाही. रोखीने व्यवहार केल्यास संस्थेची आर्थिक स्थिती चांगली राहते.

४) **ग्राहकांना दर्जेदार व निर्भेळ वस्तूंचा पुरवठा :** ग्राहक सहकारी संस्थेमार्फत ग्राहकांसाठी आवश्यक वस्तूची खरेदी उत्पादकांकडून केली जाते, त्यामुळे मध्यस्थांचे उच्चाटन झाल्याने मालाचा थेट पुरवठा उपभोक्त्यांना होतो. बऱ्याचदा व्यापारी वर्गाकडून मालात भेसळ केली जाते. ग्राहकांची होणारी फसवणूक टाळली जाते व उत्तम दर्जाच्या निर्भेळ व दर्जेदार वस्तू वाजवी किंमतीत पुरविल्या जातात .

५) **लोकशाही पद्धतीने कारभार :** ग्राहक सहकारी संस्था ग्राहकांनी एकत्र येऊन स्वेच्छेने स्थापन केलेले सहकारी तत्वावरील लोकशाही संघटन असते. संस्थेचा दैनंदिन कारभार चालविण्यासाठी तसेच संस्थेचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी सभासदांमधून संचालक मंडळाची निवड केली जाते. हे संचालक मंडळ संस्थेचा दैनंदिन कारभार लोकशाही पद्धतीने चालवितात.

६) **नफेखोरीला आळा :** ग्राहक सहकारी संस्था सेवेला प्राधान्य देतात. नफा कमविणे हा त्यांचा हेतू नसतो. संस्थांच्या वतीने विकल्या जाणाऱ्या वस्तूच्या खरेदी किंमतीमध्ये अल्प नफा मिळविला जातो. त्यातून केवळ दैनंदिन खर्च व व्यवस्थापकीय खर्च वसूल होऊन अल्पसा नफा मिळेल अशाच किंमती आकारल्या जातात. या

संस्था नफेखोरीला आळा घालण्याचा प्रयत्न करतात. संस्थेला झालेला नफा सभासदांमध्ये त्यांनी संस्थेबरोबर केलेल्या व्यवहाराच्या प्रमाणात वाटला जातो.

७) **राहणीमानात सुधारणा :** ग्राहक सहकारी संस्था सभासदांना उच्च प्रतीच्या निर्भेळ व दर्जेदार मालाचा पुरवठा करीत असल्याने ग्राहकांचे आरोग्य व राहणीमानाचा दर्जा सुधारतो.

८) **रास्त किंमत :** खाजगी व्यापारी वस्तूंची साठेबाजी करून कृत्रिम टंचाई निर्माण करतात आणि वस्तूंचा काळाबाजार करून जास्तीत जास्त दराने वस्तूंची विक्री करून अवास्तव नफा कमवितात. हे थांबविण्यासाठी ग्राहक सहकारी संस्थांची स्थापना केली जाते. दैनंदिन गरजेच्या वस्तू वाजवी किंमतीला पुरविण्याचे काम या संस्था करतात.

९) **संघटनात्मक संरचना :** भारतातील ग्राहक सहकारी संस्थांची संघीय रचना ही चार स्तरीय आहे. राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय सहकारी ग्राहक संघ, राज्य स्तरावर राज्य सहकारी ग्राहक संघ, जिल्हा स्तरावर घाऊक/केंद्रिय सहकारी ग्राहक भांडारे व प्राथमिक स्तरावर प्राथमिक सहकारी ग्राहक भांडारे कार्य करतात.

१०) **उत्पादकाकडून मालाची खरेदी :** समाजाला अथवा सभासदांना जीवनावश्यक व उपभोग्य वस्तूचा पुरवठा करण्यासाठी मालाची थेट उत्पादक किंवा कारखानदारांकडून खरेदी केली जाते. काही वस्तूंचे उत्पादन संस्था स्वत: करते त्यामुळे मालाच्या खरेदी किंमतीत बचत होऊन वाजवी किंमतीमध्ये ग्राहकांना मालाचा पुरवठा केला जातो.



**कृती–**

**१) तुमच्या परिसरातील ग्राहक सहकारी संस्थेबाबत माहिती गोळा करा.**

## १०.४ ग्राहक सहकारी संस्थांची कार्ये (Functions of Consumers Co-operative Societies) :

**• ग्राहक सहकारी संस्थांची कार्ये**

१) ग्राहकांचे हित जोपासणे
२) जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन
३) अनिष्ट व्यापारी प्रथांचे उच्चाटन
४) निर्भेळ व दर्जेदार मालाचा पुरवठा
५) उचित व्यापारी प्रथांची जोपासना
६) मध्यस्थांचे उच्चाटन
७) मक्तेदारीला आळा
८) किंमत पातळीत स्थिरता
९) सभासद शिक्षण
१०) शासनाचे प्रतिनिधीत्व करणे

❑ **ग्राहक सहकारी संस्थांची कार्ये खालीलप्रमाणे सांगता येतील.**

१) **ग्राहकांचे हित जोपासणे :** ग्राहकाचे हित जोपासणे हे महत्वाचे कार्य आहे. आपल्या सभासदांना उत्तम दर्जाच्या वस्तू रास्त दरात पुरविणे तसेच निर्भेळ माल व दैनंदिन गरजेच्या वस्तूंचा नियमितपणे पुरवठा करणे.

२) **जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन :** ग्राहक सहकारी संस्थांनी केवळ वस्तू विक्रीचे कार्य केले तर ते वस्तूंच्या किंमतीवर नियंत्रण ठेवण्यास उपयुक्त ठरणार नाही. म्हणून या संस्थांनी जीवनावश्यक वस्तूंचेही उत्पादन करण्यास सुरुवात केली आहे. वस्तूंचे उत्पादन कमीत कमी किंमतीत कशा प्रकारे करता येईल याचा विचार या संस्था करीत असतात.

३) **अनिष्ट व्यापारी प्रथांचे उच्चाटन :** वस्तूंच्या वाटप व्यवस्थेत खाजगी व्यापाऱ्यांद्वारे केली जाणारी फसवणूक, मालातील भेसळ, काळा बाजार, कृत्रिम टंचाई, खोटी वजन मापे, दिशाभूल करणाऱ्या जाहिराती इ. अनिष्ट प्रथांचे उच्चाटन ग्राहक सहकारी संस्था करतात आणि थेट उत्पादकांकडून मालाची खरेदी करून त्याची विक्री ग्राहकांना करतात.

४) **निर्भेळ व दर्जेदार मालाचा पुरवठा :** व्यापारी बऱ्याचदा जास्त नफा कमविण्यासाठी मालामध्ये भेसळ करतात. तसेच ते वस्तूच्या दर्जाविषयी व गुणवत्तेविषयी खात्री देत नाहीत. तेव्हा ग्राहक सहकारी संस्था उच्च गुणवत्ता व दर्जा असणाऱ्या वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी प्रत्यक्ष उत्पादकांकडून मालाची खरेदी करतात. त्यामुळे मालातील भेसळीला पायबंद बसतो. ग्राहकांना निर्भेळ व दर्जेदार वस्तूंचा पुरवठा करतात.

५) **उचित व्यापारी प्रथांची जोपासना :** ग्राहक सहकारी संस्था समाजाला योग्य निर्भेळ व दर्जेदार मालाचा पुरवठा करतात. मागणीनुसार मालाचा पुरवठा करणे, योग्य किंमत आकारणे, कृत्रिम टंचाई व काळा बाजार टाळणे इ. द्वारे उचित व्यापारी प्रथा जोपासल्या जातात.

६) **मध्यस्थांचे उच्चाटन :** अनेक आर्थिक व्यवहारात मध्यस्थांची संख्या खूप मोठी असते. मध्यस्थ वर्ग उत्पादक व ग्राहक या दोघांची फसवणूक करीत असतो. ग्राहक सहकारी संस्था वस्तू वितरणाच्या साखळीतील घाऊक व्यापारी, किरकोळ व्यापारी आणि इतर मध्यस्थांशी संबंध न ठेवता प्रत्यक्ष उत्पादकाकडून वस्तूची खरेदी करते. अशी वस्तू प्रत्यक्ष ग्राहकांना व सभासदांना विकल्यामुळे मध्यस्थांचे उच्चाटन होते.

७) **मक्तेदारीला आळा :** ग्राहक सहकारी संस्था आपल्या सभासदांचे हित डोळ्यासमोर ठेवून कार्य करतात. काही जीवनावश्यक व दुर्मिळ वस्तूचे स्वबळावर उत्पादन करून त्या वस्तू ग्राहकांना उपलब्ध करून देतात. त्यामुळे साहजिकच बाजारातील मक्तेदारीवर नियंत्रण ठेवणे शक्य होते व ग्राहकांच्या हिताचे संरक्षण होते.

८) **किंमत पातळीत स्थिरता :** खाजगी व्यापारी मोठया प्रमाणावर नफा मिळवितात आणि वस्तूंची कृत्रिम टंचाई निर्माण करून वस्तूंची किंमत वाढवितात. त्यामुळे ग्राहकांच्या खर्चात वाढ होते. ग्राहक सहकारी संस्था वस्तूंचे योग्य प्रकारे वितरण करण्याचा व किंमत पातळी स्थिर ठेवण्याचा प्रयत्न करतात.

९) **सभासद शिक्षण :** सभासदांना काटकसरीचे व बचतीचे महत्त्व पटवून देणे, लोकशाही मूल्यांचे शिक्षण देणे, सहकाराचे महत्त्व पटवून देणे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना संरक्षण देणे व त्यांच्या राहणीमानात सुधारणा घडवून आणणे इ. कार्ये सभासद शिक्षणाच्या माध्यमातून केली जातात.

१०) **शासनाचे प्रतिनिधीत्व करणे :** ग्राहक सहकारी संस्था या शासन, सार्वजनिक क्षेत्र आणि सहकारी क्षेत्र या मधील संस्थांचे प्रतिनिधीत्व करतात. त्यासाठी प्राथमिक ग्राहक सहकारी संस्था नियंत्रित व जीवनावश्यक वस्तूंचे वितरण करणे, संलग्न संस्थांच्या वतीने ग्राहकांच्या गरजेनुसार मालाची आयात करणे इ. कार्ये करतात. तेंव्हा सामान्य व्यक्तिंना नियंत्रित दराने वस्तू देऊन सामाजिक न्यायाचेही कार्य करतात.



कृती–

२) खाजगी व्यापारी ग्राहकांचे कशाप्रकारे शोषण करतात याबाबत शिक्षकांशी चर्चा करा.

## १०.५ ग्राहक सहकारी संस्थाचे प्रकार (Types of Consumer Co-operative Society) :

१) **प्राथमिक सहकारी ग्राहक संस्था :** वास्तविक ग्राहक संस्था याचा अर्थ प्राथमिक ग्राहक संस्था असाच आहे. ज्या संस्था ग्राहकास वस्तू विकण्याचे कार्य करतात. त्या संस्थांना प्राथमिक ग्राहक सहकारी संस्था असे म्हणतात. ग्राहकांनी एकत्र येऊन या संस्था स्थापन केलेल्या असतात. या संस्थांना वस्तूंचा पुरवठा मुख्यत: घाऊक सहकारी भांडारातून केला जातो. किरकोळ विक्री ही या संस्थाचे महत्वाचे कार्य आहे. या संस्था आपल्या सभासदांना पूरक सेवा पुरवितात. या संस्थाची स्थापना ग्रामीण व शहरी भागात केली जाते. ग्राहकांना दैनंदिन गरजेच्या निर्भेळ वस्तू वाजवी किमंतीत व वेळेवर पुरविणे हे प्राथमिक ग्राहक सहकारी भांडाराचे उद्दिष्ट असते.

२) **मध्यवर्ती ग्राहक भांडारे/सुपर बाजार/जनता बाजार/विभागीय भांडारे :** मोठमोठ्या शहरांमध्ये ग्राहकांना विविध प्रकारच्या सर्व वस्तू एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यासाठी अनेक विभाग असलेली मोठी भांडारे असतात. त्यांना मध्यवर्ती ग्राहक भांडारे/सुपर बाजार/जनता बाजार/विभागीय भांडार असे म्हणतात. सहकारी ग्राहक संस्था म्हणूनच भांडाराची नोंदणी झालेली असते.




भारतात पहिला सुपर बाजार दिल्ली येथे १५ जुलै, १९६६ रोजी स्थापन झाला. अशा प्रकारच्या भांडाराची स्थापना मुंबई, कोलकाता, हैदराबाद, चेन्नई, बेंगलोर, पुणे, नागपूर अशा शहरामध्ये दिसून येते. परंतु आता जिल्ह्याच्या ठिकाणी सुद्धा असे बाजार सुरू झाले आहेत. दिल्लीतील सुपर बाजार हा भारतातील सर्वात मोठा सुपर बाजार आहे. या भांडारातून एकाच छताखाली कापड, औषधे, स्वयंचलित यंत्राचे सुट्टे भाग, सौंदर्यप्रसाधने, दूरचित्रवाणी, इलेक्ट्रिकल उपकरणे, तयार कपडे, किराणामाल इ. वस्तूंचा पुरवठा केला जातो.

३) **विद्यार्थी ग्राहक सहकारी भांडारे :** शाळा, महाविद्यालये अथवा विद्यापीठ पातळीवर विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन सहकारी तत्वावर स्थापन केलेल्या संस्थेस 'विद्यार्थी ग्राहक सहकारी भांडार' असे म्हणतात. सन १९६७ पासून या भांडाराच्या स्थापनेचा कार्यक्रम सुरू करण्यात आला. त्यासाठी राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाकडून कर्ज व अनुदान दिले जाते. या भांडारातून विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पाठ्यपुस्तके, संदर्भ पुस्तके, शास्त्रीय उपकरणे, पुस्तक पेढी योजना, शैक्षणिक साहित्य इ. साहित्य सवलतीच्या दराने दिले जाते. या भांडाराच्या सभासदत्वासाठी वयाची अट नसते. विद्यापीठातून व महाविद्यालयांतून सहकारी तत्वावर ग्राहक भांडारे स्थापन करण्यास सरकारने उत्तेजन देण्याचे धोरण स्वीकारले आहे.

याशिवाय औद्योगिक कामगारांच्या सहकारी संस्था व ग्रामीण जनतेसाठी ग्राहक भांडारे इ. ग्राहक संघटना दिसून येतात.

ग्राहक व उत्पादक यांचा थेट संबंध आल्याशिवाय व त्यांच्यातील व्यावसायिक अंतर कमी झाल्याशिवाय ग्राहक सहकारी संस्थांचा अपेक्षित विकास होऊ शकत नाही.

**फरक – १) सहकारी पतपुरवठा संस्था व ग्राहक सहकारी संस्था**

| अ.न. | मुद्दे | सहकारी पतपुरवठा संस्था | ग्राहक सहकारी संस्था |
|---|---|---|---|
| १) | **अर्थ** | सहकारी पतपुरवठा संस्था म्हणजे सहकारी तत्त्वावर शेती व्यवसायाच्या विकासासाठी कर्ज पुरवठा करणाऱ्या संस्था होय. | ग्राहकांना त्यांच्या दैनंदिन जीवनावश्यक वस्तू व सेवा रास्त दराने उपलब्ध करून देण्यासाठी सहकारी तत्वावर ग्राहक स्वेच्छेने एकत्र येऊन ज्या संस्थेची स्थापना करतात तिला ग्राहक सहकारी संस्था असे म्हणतात. |
| २) | **उद्देश** | ग्रामीण भागातील सभासद शेतकऱ्यांची सावकारी पाशातून मुक्तता करणे. | खाजगी व्यापाऱ्यांकडून अनिष्ट मार्गाने होणारे ग्राहकांचे शोषण थांबविणे. |
| ३) | **स्थापना** | प्रामुख्याने ग्रामीण भागात स्थापन केली जाते. | प्रामुख्याने शहरी भागात स्थापन केली जाते |
| ४) | **कार्यक्षेत्र** | एका गावापुरते किंवा ४ ते ५ कि.मी कार्यक्षेत्र असते. | नागरी व ग्रामीण अशा दोन्ही भागात कार्यक्षेत्र असते. |
| ५) | **सभासदत्व** | कार्यक्षेत्रातील सीमांत व अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर व समाजातील दुर्बल घटकांना सभासदत्व दिले जाते | सर्वसामान्य ग्राहक स्वेच्छेने एकत्र येऊन अशा संस्थांचे सभासद होतात. |
| ६) | **कार्ये** | आपल्या सभासदांना व्यावसायिक व दैनंदिन गरजेच्या वस्तू खरेदी करण्यासाठी कर्ज पुरवठा करणे व सावकारी पाशातून शेतकऱ्यांची मुक्तता करणे. | वस्तूच्या किंमतीत स्थिरता, मक्तेदारीस आळा, अनिष्ट व्यापारी प्रथांचे उच्चाटन व ग्राहकांच्या हिताचे संरक्षण करून दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणे. |

### फरक– २) विपणन सहकारी संस्था व गृहनिर्माण सहकारी संस्था व ग्राहक सहकारी संस्था

| अ.न. | मुद्दे | विपणन सहकारी संस्था | गृहनिर्माण सहकारी संस्था | ग्राहक सहकारी संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | अर्थ | शेतमालास योग्य भाव मिळावा व शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताचे रक्षण व्हावे या हेतूने शेतमालाच्या खरेदी–विक्री संबंधित आवश्यक कार्ये सहकारी तत्त्वावर पार पाडण्याच्या हेतूने शेतकऱ्यांनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या संस्थांना विपणन सहकारी संस्था म्हणतात. | राहण्यासाठी घरांची गरज पूर्ण करणारी सहकारी तत्त्वावर स्थापन केलेली संस्था म्हणजे सहकारी गृहनिर्माण संस्था होय. | ग्राहकांना त्यांच्या दैनंदिन जीवनावश्यक वस्तू व सेवा रास्त दराने उपलब्ध करून देण्यासाठी व ग्राहकांच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्यासाठी सहकारी तत्त्वावर ग्राहक स्वेच्छेने एकत्र येऊन ज्या संस्थेची स्थापना करतात तिला ग्राहक सहकारी संस्था म्हणतात. |
| २ | सभासदत्व | मुख्यत: शेतकरी हे विपणन सहकारी संस्थेचे सभासद असतात. | निवाऱ्याची गरज असलेल्या अल्प व मध्यम उत्पन्न गटातील व्यक्ति सभासद असतात. | सर्वसामान्य ग्राहक हे या संस्थेचे सभासद असतात. |
| ३ | उद्‌देश | शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाला रास्त किंमत मिळवून देणे हा संस्थेचा मुख्य उद्‌देश असतो. | सर्वसामान्य व्यक्तिंच्या घराचा प्रश्न सोडविणे त्यांना वाजवी किंमतीत घरे उपलब्ध करून देणे हा या संस्थेचा उद्‌देश असतो. | ग्राहकांच्या हिताचे संरक्षण करणे हा या संस्थेचा मुख्य उद्‌देश असतो. |
| ४ | स्थापना | विपणन सहकारी संस्था शहरी व ग्रामीण भागात स्थापन केल्या जातात. | गृहनिर्माण सहकारी संस्था शहरी व निमशहरी भागात स्थापन केल्या जातात. | शहरी व ग्रामीण अशा दोन्ही भागात ग्राहक संस्था स्थापन केल्या जातात. |
| ५ | कार्ये | मालाचे एकत्रीकरण, प्रतवारी, प्रमाणीकरण, बांधणी, वाहतूक व्यवस्था करणे, शेतमालाची खरेदी विक्री करणे, योग्य किंमत मिळवून देणे. इ. कार्ये करतात. | सभासदांना राहण्यासाठी घरे उपलब्ध करून देणे हे गृहनिर्माण सहकारी संस्थेचे कार्य आहे. | वस्तूंच्या किंमतीत स्थिरता, मक्तेदारीस आळा, अनिष्ट प्रथांचे उच्चाटन, ग्राहकांच्या हितांचे संरक्षण करून दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणे इ. कार्ये करतात. |

## १०.६ सारांश

जीवनावश्यक दर्जेदार वस्तू व सेवा रास्त दराने उपलब्ध करून देण्यासाठी स्वेच्छेने स्थापन केलेली संस्था म्हणजे प्राथमिक ग्राहक सहकारी संस्था होय. सन १९०५ मध्ये पहिले ग्राहक सहकारी भांडार चेन्नई येथे सुरू झाले. ग्राहक सहकारी संस्था सभासदांना निर्भेळ माल वाजवी किंमतीत उपलब्ध करून देतात.

ग्राहकांनी स्वेच्छेने एकत्र येऊन लोकशाही पद्धतीने सहकारी तत्वावर आपल्या आर्थिक हितसबंधाचे सरंक्षण करण्यासाठी एकत्र येऊन स्थापन केलेली संस्था म्हणजे ग्राहक सहकारी संस्था होय.

व्याख्या :- "ग्राहकांनी आपल्या गरजा भागविण्यासाठी उपभोग्य वस्तू व सेवा मिळविण्यासाठी स्वेच्छेने स्थापन केलेले संघटन म्हणजे ग्राहक सहकारी संस्था होय."

- **वैशिष्ट्ये :**

१ स्थापना
२ ग्राहकांची स्वेच्छा संघटना
३ रोखीने व्यवहार
४ ग्राहकांना निर्भेळ व दर्जेदार वस्तूंचा पुरवठा
५ लोकशाही पद्धतीने कारभार
६ नफेखोरीला आळा
७ राहणीमानात सुधारणा
८ रास्त किंमत
९ संघटनात्मक सरंचना
१० उत्पादकांकडून मालाची खरेदी

- **कार्ये :-**

१ ग्राहकांचे हित जोपासणे
२ जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन
३ अनिष्ट व्यापारी प्रथांचे उच्चाटन
४ निर्भेळ व दर्जेदार मालाचा पुरवठा
५ उचित व्यापारी प्रथांची जोपासना
६ मध्यस्थांचे उच्चाटन
७ मक्तेदारीला आळा
८ किंमत पातळीत स्थिरता
९ सभासद शिक्षण
१० शासनाचे प्रतिनिधीत्व करणे

- **प्रकार :**

१ प्राथमिक ग्राहक सहकारी संस्था
२ सुपरबाजार
३ विद्यार्थी ग्राहक सहकारी भांडारे

## १०.७ महत्त्वाच्या संज्ञा

**सुपर बाजार :**

विविध प्रकारच्या वस्तूंची विक्री एकाच छताखाली केली जाते, म्हणून त्यांना 'विभागीय भांडार'/ 'सुपर बाजार' असे म्हणतात.

**विद्यार्थी ग्राहक सहकारी भांडार :**

शाळा, महाविद्यालये व विद्यापीठ पातळीवर विद्यार्थ्यांनी एकत्रित येऊन सहकारी तत्त्वावर स्थापन केलेल्या संस्थेस 'विद्यार्थी ग्राहक सहकारी भांडार' असे म्हणतात.

## १०.८ स्वाध्याय

**प्र.१ अ) खालील दिलेल्या पर्यायामधून योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१) ग्राहक सहकारी संस्था दर्जेदार वस्तूंचा पुरवठा ----- किंमतीला करतात.
अ) वाजवी ब) अधिक क) अवाजवी

२) ग्राहक सहकारी संस्था ----- कडून वस्तूंची खरेदी करतात.
अ) किरकोळ विक्रेते ब) उत्पादक क) घाऊक विक्रेते

३) राष्ट्रीय ग्राहक दिन ----- या दिवशी साजरा केला जातो.
अ) ५ जून ब) २६ जानेवारी क) २४ डिसेंबर

४) जगातील पहिली ग्राहक सहकारी संस्था ----- या देशात सुरू झाली.
अ) इंग्लंड ब) जर्मनी क) भारत

५) जगातील पहिली ग्राहक सहकारी संस्था ----- साली स्थापन झाली.
अ) १८४४ ब) १९०५ क) १९२०

६) ग्राहक सहकारी संस्था ग्राहकांना ----- वस्तूंचा पुरवठा करतात.
अ) चैनीच्या ब) जीवनावश्यक क) भेसळयुक्त

७) ग्राहक सहकारी संस्थांमुळे वस्तू वितरणाच्या साखळीतील ----- उच्चाटन होते.
अ) उत्पादकांचे ब) ग्राहकांचे क) मध्यस्थांचे

८) जगातील पहिले ग्राहक भांडार ----- हे होय.
अ) रॉश्डेल पायोनिअर्स ब) जनता बाजार क) मुंबई बाजार

## ब) योग्य जोडया जुळवा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| अ) भारतातील पहिला सुपर बाजार | १) २४ डिसेंबर |
| ब) राष्ट्रीय ग्राहक दिन | २) दिल्ली |
| क) विद्यार्थी ग्राहक सहकारी भांडार | ३) ५ जून |
| ड) ग्राहक सहकारी संस्था | ४) मुंबई |
| | ५) नोकरदारांसाठी भांडार |
| | ६) ग्राहकांचे संरक्षण |
| | ७) ग्राहकांचे शोषण |
| | ८) शाळा महाविद्यालयीन विद्यार्थी |

## क) खालील विधानांसाठी एक शब्द/शब्दसमूह लिहा .

१) विभिन्न प्रकारच्या सर्व वस्तू एकाच भांडारात उपलब्ध करून देणारी संस्था

२) विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन सहकारी तत्त्वावर सुरू केलेले भांडार

३) ग्राहकांनी परस्परांच्या हितरक्षणासाठी स्वेच्छेने एकत्र येऊन सहकारी तत्वानुसार स्थापन केलेली संस्था

४) ग्राहकांना वाजवी दरात वस्तू व सेवा पुरविणारी सहकारी संस्था

५) सन १८४४ मध्ये इंग्लंडमधील विणकरांनी एकत्र येऊन स्थापन केलेली ग्राहक सहकारी संस्था

## ड) खालील विधाने चूक किंवा बरोबर ते लिहा.

१) ग्राहक सहकारी संस्था या ग्राहक हित रक्षणासाठी स्थापन झालेल्या असतात.

२) ग्राहक सहकारी संस्थांमुळे ग्राहकांचे शोषण थांबते.

३) विद्यार्थी ग्राहक सहकारी भांडार व्यापारी स्थापन करतात.

४) ग्राहक सहकारी संस्थेतून पुरविल्या जाणाऱ्या वस्तूंच्या किंमती जास्त असतात.

५) ग्राहक सहकारी संस्थांचा मुख्य हेतू जास्तीत जास्त नफा मिळविणे हा असतो.

६) जगातील पहिली ग्राहक सहकारी संस्था अमेरिकेत स्थापन झाली.

७) ग्राहक सहकारी संस्थेमुळे निर्भेळ व दर्जेदार मालाचा पुरवठा होतो.

## इ) खालील विधाने पूर्ण करा.

१) ग्राहक सहकारी संस्थेमुळे ............... चे उच्चाटन होते.

२) ग्राहक सहकारी संस्था ग्राहकांना ........... वस्तूचा पुरवठा करतात.

३) जगातील पहिली ग्राहक सहकारी संस्था ............ या देशात सुरू झाली.

४) ग्राहक सहकारी संस्था दर्जेदार वस्तूचा पुरवठा .......... किंमतीला करतात.

५) जागतिक सहकारी चळवळीचा उगम ........... संस्थेच्या स्थापनेतून झाला.

६) ग्राहक सहकारी संस्था ............ कडून वस्तूची खरेदी करतात.

**(फ) अचूक पर्याय निवडा.**

| | |
|---|---|
| १) सुपर बाजार | |
| २) | शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थी |
| ३) ग्राहक सहकारी संस्था | |
| ४) | राष्ट्रीय ग्राहक दिन |
| ५) पहिले ग्राहक भांडार स्थापना | |
| ६) जागतिक ग्राहक दिन | |

१५ मार्च, २० सप्टेंबर १९०५, दिल्ली, विद्यार्थी ग्राहक सहकारी भांडार, ग्राहकांचे संरक्षण, २४ डिसेंबर, १९८६, गृहनिर्माण सहकारी संस्था

**ग) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) ग्राहक सहकारी संस्था म्हणजे काय?

२) मध्यस्थांकडून ग्राहकांचे शोषण कशाप्रकारे होते?

३) ग्राहक सहकारी संस्थाचे प्रकार कोणते?

४) विद्यार्थी ग्राहक सहकारी भांडार म्हणजे काय?

५) ग्राहक सहकारी संस्थांची संघीय रचना कशी असते?

**ह) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा.**

१) ग्राहक सहकारी संस्था ग्राहकांना चैनीच्या वस्तूचा पुरवठा करतात.

२) ग्राहक सहकारी संस्थांमुळे वस्तू वितरणाच्या साखळीतील उत्पादकांचे उच्चाटन होते.

३) ग्राहक सहकारी संस्था नफा मिळविण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या असतात.

४) ग्राहक सहकारी संस्थांमुळे मालाची विक्री केवळ उधारीनेच केली जाते.

५) एकाच छताखाली अनेक विभाग असलेली मोठी भांडारे म्हणजे पतपुरवठा संस्था होय.

६) जगातील पहिली ग्राहक सहकारी संस्था भारत या देशात सुरू झाली.

७) राष्ट्रीय ग्राहक दिन १ जून या दिवशी साजरा केला जातो.

**ई) गटात न बसणारा शब्द शोधा.**

१) अ) प्राथमिक सहकारी ग्राहक संस्था ब) मध्यवर्ती ग्राहक भांडारे
क) गृहनिर्माण आणि नागरी विकास महामंडळ ड) विद्यार्थी ग्राहक सहकारी भांडार

२) अ) २० सप्टेंबर ब) २४ डिसेंबर
क) २ ऑक्टोबर ड) १५ मार्च

**प्र.२ खालील संज्ञा स्पष्ट करा.**

१) सुपर बाजार

२) विद्यार्थी ग्राहक सहकारी भांडार

३) प्राथमिक ग्राहक सहकारी संस्था

**प्र.३ स्वमत लिहा./ उपयोजनावर आधारित प्रश्न.**

१) ''ग्राहक सहकारी भांडार – एक आदर्श व्यवहार'' यावर तुमचे मत लिहा.

२) वस्तू वितरणातील मध्यस्थांच्या अनिष्ट व्यापारी प्रथांबाबत आपले मत लिहा.

३) 'ग्राहक हा बाजारपेठेचा राजा असतो', यावर तुमचे मत नोंदवा.

**प्र.४ फरक स्पष्ट करा.**

१) ग्राहक सहकारी संस्था आणि विपणन सहकारी संस्था

२) सेवा सहकारी संस्था आणि ग्राहक सहकारी संस्था

३) ग्राहक सहकारी संस्था आणि पतपुरवठा सहकारी संस्था

४) ग्राहक सहकारी संस्था आणि प्रक्रिया सहकारी संस्था

५) गृहनिर्माण सहकारी संस्था आणि ग्राहक सहकारी संस्था

**प्र.५ टीपा लिहा.**

१) ग्राहक सहकारी संस्थेचे प्रकार

२) ग्राहक सहकारी संस्था

३) ग्राहक सहकारी संस्थेची वैशिष्ट्ये

**प्र.६ कारणे द्या.**

१) वस्तू वितरण व्यवस्थेत ग्राहक सहकारी संस्था महत्त्वाची भूमिका पार पाडतात.

२) ग्राहक सहकारी संस्था रास्त किंमतीला वस्तूचा पुरवठा करतात.

३) ग्राहक सहकारी संस्थेमुळे ग्राहकांचे शोषण थांबते.

४) ग्राहकांच्या हित रक्षणासाठी ग्राहक सहकारी संस्था स्थापन झालेल्या आहेत.

५) ग्राहक सहकारी संस्थांकडून वस्तू विक्री व्यवहारातील मध्यस्थांचे उच्चाटन होते.

**प्र.७ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) ग्राहक सहकारी संस्थाची वैशिष्ट्ये लिहा.

२) ग्राहक सहकारी संस्थेचा अर्थ व व्याख्या लिहा.

३) ग्राहक सहकारी संस्थेची कार्ये लिहा.

**प्र.८ दिर्घोत्तरी प्रश्न.**

१) ग्राहक सहकारी संस्था म्हणजे काय ? ग्राहक सहकारी संस्थेची कार्ये सविस्तर लिहा.

२) ग्राहक सहकारी संस्थेची व्याख्या लिहून वैशिष्ट्ये सविस्तर स्पष्ट करा.

## संदर्भ सूची

लेखकांनी पाठ्य घटकांचे लेखन करतांना वापरलेली संदर्भ सूची


१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे – प्रथमावृत्ती २००९
इयत्ता ११ वी सहकार

2) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे – प्रथमावृत्ती २०१३
इयत्ता ११ वी सहकार

3) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे – प्रथमावृत्ती २०१३
इयत्ता १२ वी सहकार

4) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे – प्रथमावृत्ती २०१३
इयत्ता १२ वी वाणिज्य संघटन आणि व्यवस्थापन

५) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०

६) महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारित) अधिनियम, २०१३

७) कंपनी कायदा २०१३


## ABBREVIATIONS

| | | |
|---|---|---|
| PCCS | – | Primary Consumers Co-operative Society. |
| PCMS | – | Primary Co-operative Marketing Society. |
| PSR | – | Profit Sharing Ratio. |
| PROC | – | Processing. |
| RBI | – | Reserve Bank of India. |
| SCB | – | State Co-operative Bank. |
| SCCF | – | State Co-operative Consumers Federation. |
| SCMF | – | State Co-operative Marketing Federation. |
| DCCB | – | District Central Co-operative Bank. |
| STL | – | Short Term Loan. |
| MTL | – | Middle Term Loan. |
| NCHFI | – | National Co-operative Housing Federation of India. |
| AMUL | – | Anand Milk Union Limited. |
| HUDCO | – | Housing and Urban Development Corporation. |
| HDFC | – | Housing Development Finance Corporation. |
| ICA | – | International Co-operative Alliance. |
| MAHANAND DAIRY | – | Maharashtra State Co-operative Milk Federation |
| NABARD | – | National Bank for Agricultural and Rural Development. |
| NCCF | – | National Co-operative Consumers Federation. |
| NCDC | – | National Co-operative Development Corporation. |
| NDDB | – | National Dairy Development Board. |